# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६३ वे अंक ४८) पोस्टाचा परवाना नं. / अे / आर / ए.जी.डी. – ०७ / २०२३ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार, दि.०८ फेब्रुवारी २०२४ (पाने ४) (किंमत २ रुपये)


## अजित पवारांची सुप्रीम कोर्टात धाव; शरद पवार गटाच्या अगोदर कॅव्हेट दाखल

मुंबई दि.७ (प्रतिनिधी)- राष्ट्रवादी कॉँग्रेस (अजित पवार गट) ने सर्वोच्च न्यायालयात कॅव्हेट दाखल केले आहे. राष्ट्रवादी कॉँग्रेस अजित गटाच्या वतीने अधिवक्ता अभिकल्प प्रताप सिंह यांनी याचिका दाखल केली आहे. दुसऱ्या गटाने (शरद पवार गट) सर्वोच्च न्यायालयात आपली बाजू मांडली तर अजित पवार गटाच्या विरोधात कोणताही एकतर्फी आदेश निघणार नाही याची खात्री करण्यासाठी हे आहे.

६ फेब्रुवारी रोजी निवडणूक आयोगाने महाराष्ट्र सरकारमधील अजित पवार गटाला खरी राष्ट्रवादी म्हणून घोषित केले होते. आयोगाने राष्ट्रवादीला पक्षाचे नाव आणि घाडी अजित गटाला निवडणूक चिन्ह दिले.

६ महिने चाललेल्या १० सुनावणीनंतर निवडणूक आयोगाने हा निर्णय दिला. बहुसंख्य आमदारांनी अजित गटाला राष्ट्रवादीचे नाव आणि निवडणूक चिन्ह मिळवून देण्यासाठी मदत केल्याचे आयोगाने म्हटले आहे. यावर अजित पवार म्हणाले- लोकशाहीत बहुमताला महत्त्व दिले जाते. त्यामुळे निवडणूक आयोगाने आम्हाला राष्ट्रवादी कॉँग्रेस हे नाव आणि निवडणूक चिन्ह दिले आहे.

## कॉँग्रेसच्या सत्ताकाळातील अर्थव्यवस्थेवरुन पंतप्रधान मोदींची टीका

### पंडीत नेहरुंनाही केले लक्ष्य; ओबीसींना आरक्षण निट दिले नसल्याचा आरोप

नवी दिल्ली दि.७ (वृत्तसंस्था)- कॉँग्रेसने दहा वर्षात अर्थव्यवस्थेची प्रगती किती केली? १२ क्रमांकावरुन ११ व्या क्रमांकावर. आम्ही पाचव्या क्रमांकावर अर्थव्यवस्था आणली आहे. हे कॉँग्रेसवाले आम्हाला अर्थव्यवस्थेवर शिकवत आहेत. कॉँग्रेसने ओबीसींना आरक्षणही नीट दिलं नाही. बाबासाहेब आंबेडकर भारतरत्न देण्यास योग्य नाहीत असं ज्यांना वाटत होतं आणि ज्यांनी आपल्याच कुटुंबातल्या लोकांना भारतरत्न पुरस्कार दिले असे लोक आम्हाला उपदेश देत आहे. सामाजिक न्याय या विषयावर आम्हाला ते शिकवत आहेत. ज्या कॉँग्रेसच्या नेत्याची गॅरंटी नाही, नीतीची काही गॅरंटी नाही ते मोदी गॅरंटीवर प्रश्न कसे काय उपस्थित करत आहेत? असाही प्रश्न मोदी यांनी विचारला आहे.

एक तक्रार अशी होती की देश आणि जग यांच्या दहा वर्षांच्या कार्यकाळाकडे असं का पाहतो? देशाला यांचा इतका राग का आला? ही यांच्याच कर्माची फळं आहेत. जे काही करणार त्याची फळं इथेच भोगायची आहेत. आम्ही लोकांना सांगितलं नाही तुम्ही यांच्याविषयी असं बोला. लोकच यांच्याविषयी बोलत आहेत. मी एक म्हणणं वाचून दाखवतो. 'सदस्यांना माहीत आहे की आपली ग्रोथ कमी झाली आहे. महागाईचा दर वाढतो आहे. करंट अकाऊंट डेफिसिट आमच्या अपेक्षेपेक्षा जास्तच गेलाय.' हे म्हणणं माझं नाही मनमोहन सिंग यांचं हे म्हणणं आहे. देशाची अवस्था काय हे



त्यांनी सांगितलं होतं. मी आता दुसरं म्हणणं वाचून दाखवतो. 'देशात खूप राग आहे, सरकारी संस्थांचा गैरवापर होतो आहे.' असंही मनमोहन सिंग यांनी म्हटलं होतं. आता मी तिसरं म्हणणं मांडतो, 'टॅक्स कलेक्शनमध्ये भ्रष्टाचार होतो, त्यामुळे जीएसटी आणला पाहिजे. गरीबातला गरीब हा आणखी गरीब होतोय त्याला त्यातून बाहेर काढलं पाहिजे. सरकारी कंत्राटं जशी दिली जात आहेत त्यावर प्रश्न उपस्थित होत आहेत ही पद्धतही बदलली पाहिजे.' हे देखील माजी पंतप्रधान मनमोहन सिंग म्हणाले होते. त्यांच्या आधी एक पंतप्रधान म्हणाले होते की दिल्लीतून मी १ रुपया पाठवतो पण पोहचतात १५ पैसे. आजार काय हे माहीत होतं. पण त्यावर सुधारणा काहीच केल्या गेल्या नाहीत. असाही टोला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे.

मोदींनी राज्यसभेत पंडीत नेहरूंनी मुख्यमंत्र्यांना पाठवलेल्या एका पत्राचा उल्लेख करत, 'मला कोणतेही आरक्षण आवडत नाही' अशी भूमिका नेहरूंची होती असा दावा केला. यावेळी त्यांनी राज्यसभेत नेहरूंचे ते पत्र देखील वाचून दाखवले.

आपल्या भाषणात बोलतांना मोदी म्हणाले की, 'नेहरूंनी मुख्यमंत्र्यांना एक पत्र लिहिले होते. त्यात त्यांनी लिहिले होते की, मला कोणतेही आरक्षण आवडत नाही, खास करून नोकरीमधील आरक्षण... अकार्यक्षमतेला चालना देणाऱ्या अशा कोणत्याही गोष्टीच्या मी विरोधात आहे. पंडित नेहरूंनी मुख्यमंत्र्यांना लिहिलेले हे पत्र आहे. त्यामुळे मुळात कॉँग्रेसचाच एससी-एसटी आरक्षणाला विरोध असल्याचे मी म्हणतो, असे मोदी म्हणाले. तसेच, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नसते तर एसटी आणि एससीला आरक्षण मिळाले असते की नाही याबाबत शंका असल्याचे देखील मोदी म्हणाले.

भाजपच्या मदतीमुळे डॉ. बाबासाहेब आंबेडक यांना भारतरत्न (पान ४ वर)

## पंतप्रधान देशाचा असतो पक्षाचा नसतो

### शरद पवारांकडून पीएम मोदींच्या विनोदी भाषणाची चिरफाड

नवी दिल्ली दि.७ (वृत्तसंस्था)- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पंडित नेहरु यांच्यावर केलेल्या टीकेचा राष्ट्रवादी कॉँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी समाचार घेत त्यांच्या भाषणाची चिरफाड केली आहे. पंतप्रधान देशाचा असतो, तो एका पक्षाचा नसतो असे सांगत खडे बोल सुनावले. शरद पवार यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना नरेंद्र मोदींनी चुकीची व्यवस्था स्वीकारली असल्याचा घणाघात केला.

लोकशाहीमध्ये अधिकार महत्वाचे असतात, चुकीला चूक म्हणता आलं पाहिजे. चुकीचा कार्यक्रम असो, चुकीचं काम असो.. चुकीला विरोध केला पाहिजे. मी आता एक तास पंतप्रधान नरेंद्र मोदींचं भाषण ऐकलं, त्यामध्ये मोदींच्या भाषणात समाजात एकता निर्माण



व्हावी यासाठी काही नव्हतं. मोदींच्या भाषणात विनोद होते, अशा शब्दात शरद पवार यांनी मोदींच्या भाषणाची चिरफाड केली.

पीएम मोदींच्या भाषणाचा समाचार घेताना शरद पवार म्हणाले की, पंतप्रधान देशाचे असतात. पंडित जवाहरलाल नेहरू देशाचे पहिले पंतप्रधान होते. नेहरूंनी देशाचा चेहरा बदलण्याचं काम केलं. त्यावेळी जवाहरलाल नेहरू आणि आज पंतप्रधान नरेंद्र मोदी आहे. दिवंगत नेत्यांवर टीका योग्य नसल्याचे खडे बोल शरद पवार यांनी पीएम मोदींना सुनावले. मोदींचं भाषण ऐकून दु:ख झालं असल्याचे ते म्हणाले. इंदिरा गांधी असो, जवाहरलाल नेहरू यांचं प्रत्येकाचं देशासाठी विकासात योगदान आहे. नरेंद्र मोदींनी चुकीची व्यवस्था स्वीकारली आहे.

ते पुढे म्हणाले की, विद्यापीठांमध्ये धार्मिक धुव्रीकरणाचा वर्ग तयार केला जात असल्याचे आपण पाहत आहोत. याची सुरुवात दिल्ली विद्यापीठात झाली. आता दिल्लीपर्यंत हे मर्यादित राहिलं नसून पुणे असो किंवा मुंबई असो याठिकाणी या घटना घडत आहेत. या धर्मांध शक्तींविरोधात एक जबरदस्त संघटन आपल्याला तयार करावं लागेल. जे सुरू आहे ते अतिशय (पान ४ वर)

## राष्ट्रवादी आमदार अपात्रता निकाल मेरिटनुसारच होणार; राहुल नार्वेकरांचे स्पष्टीकरण

मुंबई दि.७ (प्रतिनिधी)- राष्ट्रवादी कॉँग्रेस आमदार अपात्रता प्रकरणी मेरिटनुसारच निकाल दिला जाईल. निवडणूक आयोगाने दिलेल्या निकालाचा कुठलाही संबंध या निकालाशी जोडला जाणार नाही, असं विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी स्पष्ट केले. राष्ट्रवादी पक्षाबाबत विधान भवनाकडून कोणतीही कागदपत्रे निवडणूक आयोगाकडून मागवण्यात आलेली नाहीत, असं राहुल नार्वेकर म्हणाले.

राष्ट्रवादी आमदार अपात्रप्रकरणी मेरिट नुसारच निकाल दिला जाणार आहे.



निवडणुक आयोगाने दिलेल्या निकालाचा कुठलाही सबंध या निकालाशी जोडला जाणार नाही. राष्ट्रवादी पक्षाबाबत विधान भावनाकडून कोणतीही कागदपत्रे निवडणूक आयोगाकडून मागवण्यात आलेली नाहीत, अशी माहिती विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिली आहे.

## शरद पवारांच्या गटाला 'राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार' असे मिळाले नाव !

नवी दिल्ली दि.७ (वृत्तसंस्था)- राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षनाव व घड्याळ हे पक्षचिन्ह अजित पवार गटाला देण्याचा निकाल निवडणूक आयोगानं दिला. त्यानंतर शरद पवार गटाला नेमकं कोणतं नाव किंवा चिन्ह मिळणार? याची उत्सुकता राजकीय वर्तुळात लागून राहिली होती. त्यासाठी शरद पवार गटाकडून तीन नावांचे पर्याय निवडणूक आयोगाला सादर करण्यात आले होते. त्यातील एका नावावर निवडणूक आयोगानं शिक्कामोर्तब केलं आहे. येत्या २८ फेब्रुवारीपर्यंत, अर्थात राज्यसभा निवडणुका पार पडेपर्यंत हे नाव वैध असेल, असं निवडणूक आयोगाकडून स्पष्ट करण्यात आलं आहे.

शरद पवार गटाकडून सादर करण्यात आलेल्या तीन पर्यायांपैकी एक पर्याय निवडणूक आयोगानं मंजूर केला आहे. नॅशनॅलिस्ट कॉँग्रेस पार्टी – शरद पवार, नॅशनॅलिस्ट कॉँग्रेस पार्टी – शरदचंद्र पवार व नॅशनॅलिस्ट कॉँग्रेस पार्टी – एस असे तीन पर्याय आयोगाला सुचवण्यात आले होते. त्यातील दुसरा पर्याय आयोगानं मंजूर केला आहे. त्यामुळे राज्यसभा निवडणूक पार पडेपर्यंत शरद पवार गट या नावाने ओळखला जाणार आहे.

दरम्यान, शरद पवार यांच्या गटाच्या वतीने पक्ष चिन्हासाठी तीन नाव देण्यात आले आहे. त्यात वटवृक्ष, उगवता सूर्य आणि कपबशी या नावांचा समावेश आहे. काही सुत्रांकडून सांगण्यात आले की, या तीन नावांपैकी वटवृक्ष नावाची चर्चा सर्वाधिक आहे. निवडणूक आयोगाकडून वटवृक्ष चिन्ह देण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

पक्षचिन्ह व पक्षनाव अजित पवार गटाला देण्याचा निकाल निवडणूक आयोगानं दिला असून या निकालाविरोधात शरद पवार गट सर्वोच्च न्यायालयात दाद मागणार आहे. शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी यासंदर्भात माध्यम प्रतिनिधींना माहिती दिली आहे. सर्वोच्च न्यायालयानेच नमूद केलेल्या निकषांचं उल्लंघन करून निवडणूक आयोगानं हा निकाल दिल्याचा दावा शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे. तसेच, जर दोन्ही गटांच्या नेत्यांची नियुक्ती अवैध ठरते, तर मग आयोगानं कुठल्या निकषांच्या आधारावर अजित पवार गटाला पक्षनाव न चिन्ह देण्याचा निर्णय घेतला? असा सवालही आव्हाड यांनी उपस्थित केला आहे.

## मनसे नेत्यांची देवेंद्र फडणवीसांशी बंद दाराआड चर्चा

मुंबई दि.७ (प्रतिनिधी)- महाराष्ट्राच्या राजकारणात आता नवा ट्विस्ट आला असून एकीकडे महाविकास आघाडी आणि दुसरीकडे महायुती असताना सर्वजण मनसेच्या भूमिकेकडे डोळे लावून बसले होते. मनसे भाजपसोबत जाणार अशी बऱ्याच दिवसांपासून चर्चा होतीच, त्यात आता बंद दाराआड झालेल्या बैठकीची भर पडली आहे. मनसे नेते बाळा नांदगांवकर, नितिन सरदेसाई आणि संदीप देशपांडे या तिघांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली आणि पुन्हा मनसे भाजपसोबत जाणार असल्याच्या चर्चांना उधाण आलं.

मनसे नेत्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची गुरूवारी तर सोमवारी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची भेट घेतली. लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने या बैठकीत चर्चा झाल्याचं समोर येतंय. आता भाजप-शिवसेना- राष्ट्रवादी आणि मनसे ही नवी युती होणार का? ही युती झाली तर काय फॉर्म्युला असेल? याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.

लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने ही बैठक झाल्याची माहिती समोर येत आहे. भाजपचं लोकसभेत मिशन ४५ आहे, त्यासाठी सर्वच पक्षांना सोबत घेऊन जाण्याची त्यांची रणनीती आहे. त्यात लोकसभेत मनसैनिक भाजपच्या कार्यकर्त्यांच्या खांद्याला खांदा लावून काम करताना दिसू शकतात.

## सगेसोयरे कायदा मंजूर होणारच

### जरांगेंचा विश्वास; १० फेब्रुवारीपासून पुन्हा उपोषण करणार

मुंबई दि.७ (प्रतिनिधी)- मराठ्यांच्या जीवावर मोठे झालात आणि मराठ्यांच्याच आरक्षणाला विरोध करता, बस झालं, आता यापुढे तुम्हाला आमच्या जीवावर मोठं होऊ देणार नाही. मी जिवंत असेपर्यंत मराठ्यांच्या जिवावर कोणालाच मोठं होऊ देणार नाही. जे आमच्या बाजूने बोलतात. आमच्या गोरगरीब लेकरांच्या कल्याणाचा विचार करतात, त्यांचाच आम्ही देखील विचार करू, असा घणाघात मनोज जरांगे यांनी विरोधकांवर केला. तर कामोठे या ठिकाणी मुंबई डबेवाले असोसिएशनच्या वतीने जरांगे यांना पाठिंबा देण्यात आला.

जरांगे यावेळी बोलताना म्हणाले की, विरोधकांना मी एकटाच काफी आहे, त्यांना मी पुरून उरेल, जो माझ्याविरुद्ध बोलतो त्याच्यात दम असेल तर त्यांनी समोर येऊन दाखवावं, त्याला पुरून उरेल. मला त्यांच्यात किती दम आहे, हेच पाहायचं आहे, असे म्हणत त्यांनी छगन भुजबळ यांचे नाव न घेता त्यांच्यावर अप्रत्यक्षपणे टीका केली. तर कायद्याच्या अंमलबजावणीसाठी मी १० फेब्रुवारीपासून बेमुदत उपोषणाला बसणार आहे, असे ते म्हणाले.

सगेसोयरे अद्यादेश पारीत होऊन त्याचे कायद्यात रुपांतर होणार आहेच. त्यासाठी वेळेला जीव गेला तरी चालेल, मेलो तरी बेहत्तर, मराठा समाजाला कायद्याच्या चौकटीत कायमस्वरुपी टिकणारे आरक्षण दिल्याशिवाय मी शांत बसणार नाही, असेही जरांगे म्हणाले.

## उत्तराखंड विधानसभेत समान नागरी कायदा विधेयक मंजूर

### यूसीसी लागू करणारे ठरले पहिले राज्य !

नवी दिल्ली दि.७ (वृत्तसंस्था)- उत्तराखंड सरकारने आज (६ फेब्रुवारी) विधानसभेत समान नागरी कायद्याबाबतचे (यूसीसी) विधेयक सादर केले. हे विधेयक उत्तराखंडच्या विधानसभेत आज (७ फेब्रुवारी) मंजूर करण्यात आले. विधानसभेत समान नागरी कायदा विधेयक मंजूर केल्याने उत्तराखंड समान नागरी कायदा लागू करणारे देशातील पहिले राज्य बनले आहे.

आगामी लोकसभा निवडणूक अवघ्या काही महिन्यांवर येऊन ठेपली आहे. या निवडणुकीच्या अनुषंगाने वेगवेगळे राजकीय पक्ष आपापल्या पद्धतीने तयारी करत आहेत. उत्तराखंडमध्ये सध्या भाजपाचे सरकार आहे. या सरकारने उत्तराखंडच्या नागरिकांना समान नागरी कायदा (यूसीसी) लागू करण्याचे आश्वासन दिले होते. याच आश्वासनाची (पान ४ वर)

## बसमध्ये बॉम्बसदृश्य वस्तू आढळल्याने नागपूरात एकच खळबळ

नागपूर दि.७ (प्रतिनिधी)- राज्य परिवहन महामंडळाच्या गणेशपेठ बसस्थानकात उभ्या असलेल्या बसमध्ये एक बॉम्ब सदृश्य वस्तू सापडून आली आहे. बॉम्ब सापडल्याची बातमी समजताच परिसरामध्ये एकच खळबळ उडाली. त्यानंतर घटनेची माहिती तत्काळ गणेशपेठ पोलीस आणि बॉम्ब निकामी पथकाला देण्यात आली. पोलिसांना माहिती मिळताच पोलीस आणि बॉम्ब निकामी करणाऱ्या पथकाने तत्काळ घटनास्थळ गाठले. बॉम्ब सदृश्य वस्तू ताब्यात घेत त्या संशयास्पद वस्तूला सुराबर्डी येथे निकामी करण्यासाठी नेण्यात आले. ज्या बसमध्ये बॉम्ब सदृश्य वस्तु सापडली होती, ती बस गडचिरोलीतील अहेरी आगारातून नागपुरात पोहोचली असल्याची प्राथमिक माहिती सामोर आली आहे. पोलिसांनी बसस्थानकाची तपासणी करून या प्रकरणाच्या सखोल तपास सुरू केला आहे.

गडचिरोली येथून एमएच ४० वाय ५०९७ या क्रमांकाची बस एक फेब्रुवारीला गणेश पेठ स्थानकात रात्री होलटींगसाठी आली होती. त्यानंतर दुसऱ्या दिवशी गाडीचे काम निघाल्याने ही गाडी गणेश पेठ आगारात उभी होती. दरम्यान ही गाडी सावनेर येथे देखील गेली होती. नंतर ही गाडी आज सकाळी पावणे बारा वाजताच्या सुमारास परत गणेशपेठ बस स्थानकावर आली. दरम्यान एका कर्मचाऱ्याला या बसमध्ये संशयास्पद एक टिफिनच्या आकाराची वस्तु आढळून आली. त्याचे निरीक्षण केले असता ही वस्तु अनोळखी आणि बॉम्ब सदृश्य भासल्याने त्या कर्मचाऱ्याने ही बाब आपल्या वारिष्ठाना सांगितली. त्यानंतर या बाबत माहिती पोलिसांना दिली असता त्यांनी घटनास्थळी धाव घेत बस स्थानक निर्मनुष्य करत पुढील तपास सुरू केला.

## राज्यातील निवासी डॉक्टरांचा संप मागे

मुंबई दि.७ (प्रतिनिधी)- राज्यातील निवासी डॉक्टरांचे वेतन वेळेत मिळत नसल्याने १० तारखेच्या आत पगार तसेच विद्या वेतनमध्ये १० हजार रुपये वाढ करण्यासाठी येणाऱ्या मंत्रिमंडळ बैठक घेण्यात येईल, आदी आश्वासन सरकारकडून देण्यात आल्यानंतर संप माघार घेण्यात आला आहे. निवासी डॉक्टरांच्या विद्यावेतनात १० हजार रुपयांची भरीव वाढ करण्यासह ठराविक तारखेला नियमित विद्यावेतन, वसतिगृहांची तातडीने दुरुस्ती करणार असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले.

नवीन हॉस्टेलच्या संदर्भामध्ये संचालक, आयुक्त यांना निर्णय देण्यात आला आहे. नवीन होस्टेल आणि दुरुस्तीसाठी त्वरित ८० कोटी रुपये दिले आहेत, असेही सरकारकडून स्पष्ट करण्यात आले. यानंतर आम्ही ७ ते १० दिवसांची वाट पाहू. मात्र, त्यानंतर जर सर्व मागण्या मान्य नाही झाल्या तर पुढची भूमिका स्पष्ट करु, असा इशारा राज्यातील निवासी डॉक्टरांकडून देण्यात आला आहे.

## युवक कॉँग्रेस प्रदेशाध्यक्ष कुणाल राऊतांना मोठा दिलासा; न्यायालयाकडून जामीन मंजूर

नागपूर दि.७ (प्रतिनिधी)- युवक कॉँग्रेस प्रदेश अध्यक्ष कुणाल राऊत यांना न्यायालयाकडून मोठा दिलासा मिळाला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या पोस्टरला काळं फासल्या प्रकरणी कुणाल राऊत यांना न्यायालयाकडून दोन दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली होती. त्यानंतर नागपूर पोलिसांनी कुणाल राऊतांच्या कोठडीत आणखी वाढ करण्याची मागणी केली होती. मात्र न्यायालयाने या प्रकरणी सुनावणी करत पोलिसांची मागणी फेटाळत जामीन मंजूर केला.

नागपूर जिल्हा परिषदेत पंतप्रधान मोदी यांच्या पोस्टर विद्रुपीकरण केल्याप्रकरणी नागपूर पोलिसांनी कुणाल राऊत यांना अटक केली होती. त्यानंतर कुणाल राऊत यांना सोमवारी सत्र न्यायालयात हजर करण्यात आलं होतं. दरम्यान, कुणाल राऊत यांना जिल्हा सत्र न्यायालयाकडून कोणताही दिलासा मिळाला नसून त्यांना आणखी दोन दिवस पोलीस कोठडीत रहावं लागले होते. त्यानंतर त्यांनी या प्रकरणी आपल्या जामीनासाठी अर्ज केला होता. तर नागपूर पोलिसांनी राऊतांच्या कोठडीत आणखी वाढ करण्याची मागणी केली होती. या प्रकरणी नागपूर न्यायालयाने पोलिसांची मागणी फेटाळून कुणाल राऊतांना दिलासा दिला आहे. न्यायिक कोठडीमध्ये २५ हजार रुपये जातमुचलका आणि १० हाजर रुपये रोख घेत जमानतीसह न्यायालयाकडून हा जामीन मंजूर केला.

## राहुल गांधी अमेठीतून लोकसभा न लढण्याची शक्यता

### सोनिया गांधींनाही तेलंगणातून लढण्याचा प्रस्ताव

नवी दिल्ली दि.७ (वृत्तसंस्था)- कॉंग्रेस खासदार राहुल गांधी यावेळी अमेठीतून लोकसभा निवडणूक न लढण्याची शक्यता आहे. तर, कॉंग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधींनाही तेलंगणातून निवडणूक लढण्याचा प्रस्ताव आला आहे. तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांनी सोनिया गांधी यांना विनंती केल्याची या क्षणाची सर्वात मोठी बातमी आहे.

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांनीसुद्धा काल (६ फेब्रुवारी रोजी) सोनिया गांधी यांची या संदर्भात भेटही घेतल्याचं पुढे आलं होतं. मिळालेल्या माहितीनुसार, राहुल गांधी हे (पान ४ वर)

# भीमसूर्याचे आभाळ पेलणारी रमाई

रमाई म्हणजे त्यागमूर्ती, कारुण्याची माता अन् बाबासाहेबांची प्रेरणा होय. ज्यांनी आपले संपूर्ण आयुष्य आपल्या पतीसाठी, आपल्या संसारासाठी वेचले आणि त्यासाठी सदा धडपडीने आणि तळमळीने, आपले तन, मन, धनाने कार्यतत्पर होऊन राबणारी अशी स्त्री होय. रमाई होती म्हणूनच बाबासाहेब घडले. भीमराव दिवा होते तर रमा त्या दिव्याची वात होती आणि ही वात अविरतपणे बाबासाहेबांसाठी तेवत होती. बाबासाहेबांना प्रत्येक वळणावर, प्रत्येक क्षणाला रमाई साथीला होती. रमामुळे बाबासाहेबांना संसारातील अनेक अडचणींना सामोरे जाता आले.

रमा या भिकू वलंगकरांच्या कन्या. रमाला ३ बहिणी व एक भाऊ होता. थोरल्या बहिणीचे लग्न झाले होते आणि तिला दापोलीला दिले होते. लहानपर्णीच रमाची आई रुक्मिणीचे आजारपणाने निधन झाले. आईच्या जाण्याने कोवळया रमाच्या मनावर याचा खूप मोठा आघात झाला होता. रमाचे वडील भिकू हे बंदरावर माशांनी भरलेल्या टोपल्या नेऊन देत असत. त्यांना छातीचा त्रास होता. तरीही भिकू आपल्या मुलांसाठी दररोज बंदरावर जायचे आणि माशांनी भरलेल्या टोपल्या नेऊन द्यायचे. त्यांना आपल्या मुलांची खूप चिंता होती. अशातच रमाचे वडील भिकू यांचेही निधन झाले. रमा आणि तिची भावंडे पोरकी झाली होती. रमा खूप समंजस अन् कार्यतत्पर होती. तिला सर्व गोष्टींची जाण होती. त्यांचे लहान भाऊ व बहीण अजाण होती. त्यामुळे त्यांची जबाबदारीही आता रमावर आली होती. रमाला जबाबदारी पेलण्याचे बहुधा इथूनच धडे मिळाले.

या पोरक्या मुलांना सावरण्यासाठी रमाचे काका व मामा पुढे सरसावले. रमाला आणि तिच्या भावंडांना घेऊन वलंगकर काका आणि गोविंदपूरकर मामा मुंबईला भायखळ्यात राहायला गेले. तिथे सुभेदारांच्या भीमरावांसोबत रमाचे लग्न झाले. लग्नाच्या वेळेस भीमराव १४ वर्षांचे अन् रमा केवळ ९ वर्षांची होती. लग्न अगदी साधेच झाले. नंतर रमा भीमरावांच्या सावली बनून राहिल्या. भीमराव शिक्षणासाठी लंडनला गेले असताना, रमा आपल्या संसारात दुष्काळाच्या आगीशी लढत होती. स्वाभिमानी पतीची ती स्वाभिमानी पत्नी होती. रमाने मोठ्या धैर्याने, जिद्दीने आलेल्या संकटांवर मात केली.रमाने अनेक मरणे पाहिली. लहानपणी आई- वडिलांचा मृत्यू, नंतर रामजी सुभेदारांचा, त्यापाठोपाठ बाबासाहेबांचे भाऊ आनंदराव अन् आनंदरावांचा मुलगा, बाबासाहेबांची सावत्र आई जिजाबाई व त्यांची स्वत:ची मुलगी इंदू व मुलगा बाळ गंगाधर या साऱ्यांचे मृत्यू रमाच्या मनात दु:खाचे डोंगर करून बसले होते. असे असतानाही तिने आपले कार्य प्राणपणाने अन् तत्परतेने पार पाडले.

बाबासाहेबांचे उच्च शिक्षण चालू होते आणि रमा त्यांना कोणत्याही गोष्टीची जाण न होऊ देता संसारात होणारी वाताहत त्या झेलत होत्या. अगदी आपल्या राजरत्न या मुलांच्या मृत्यूचोही बाबासाहेबांना कळविले नाही. संसारात त्यांना खूप अडचणींना सामोरे जावे लागले. त्या एकट्या होत्या अन् घर चालविण्यासाठी तिने अक्षरश: शेणाच्या गौऱ्या थापल्या. मुलांना खायला मिळायचे नाही म्हणून रमाने उपास - तपास केले. सवर्णीयांना दिसू नये म्हणून त्या रातीला शेणासाठी वणवण भटकायच्या. शेण जमा करून गौऱ्या थापायच्या अन् जी काही मिळकत आहे ती संसारासाठी अन् बाबासाहेबांच्या शिक्षणासाठी जोडून ठेवायच्या. परदेशात जाऊन शिक्षण घेणाऱ्या बाबासाहेबांना त्यांनी आपल्या दु:खाची झळ कधी पोहोचूच दिली नाही.

बाबासाहेब परदेशातून परतून आले तेव्हा मुंबईच्या बंदरावर त्यांचे स्वागत करण्यासाठी जनता आली होती. बाबासाहेबांच्या जयजयकाराने बंदर दुमदुमले होते. रमालाही साहेबांच्या भेटीची ओढ होती. पण त्यांना नेसण्यासाठी चांगली साडी नव्हती म्हणून राजश्री शाहू महाराजांनी बाबासाहेबांना दिलेला भरजरी फेटा लपेटला अन् त्या निघाल्या. पण त्यांनी दुरूनच साहेबांचे दर्शन घेतले. तरीही बाबासाहेबांची नजर रमावर गेलीच. साहेबांनी रमाला विचारलं रमा सर्वजण मला भेटत आहेत आणि तू असं दुरून का बरं. रमाणे मोठ्या उदार मनाने उत्तर दिलं. तुम्हाला भेटण्यासाठी सारी जनता उत्सुक असताना त्यांच्या आधी मी भेटणे हे तर योग्य नाही. मी तर तुमची पत्नी तुम्हाला कधी भेटू शकते. अशा उदार मनाच्या, करुणाशील अन् शांत स्वभावाच्या रमाईंनी बाबासाहेबांना साथ दिली अन् बाबासाहेबांनीही रमाच्या कष्टाचे चीज करत परदेशात त्यांनी ज्ञानदान घेऊन बॅरिस्टर झाले. अठरा अठरा तास अभ्यास करून, प्रसंगी उपाशी राहून त्यांनी उच्चशिक्षण पूर्ण केले. आपल्या भारतात समता, बंधुता, धर्मनिरपेक्षता नांदण्यासाठी संविधान लिहिले. पण या साऱ्याची प्रेरणा होती ती फक्त आणि फक्त रमाईच.

# भिष्माचार्यांना 'भारतरत्न'

**भारतीय** जनसंघापासून ते भारतीय जनता पक्षातील कार्यकर्त्यांच्या चार पिढ्या घडविणाऱ्या, पक्ष बांधणीसाठी अविश्रांत परिश्रम केलेल्या आणि संघ स्वयंसेवकापासून ते उपपंतप्रधान पदापर्यंत पोहोचलेल्या लालकृष्ण अडवाणी यांना 'भारतरत्न' हा देशाचा सर्वोच्च नागरी सन्मान जाहीर झाल्याचे कळताच सर्वसामान्य कार्यकर्त्याला अभिमान तर वाटलाच पण सामान्य लोकांनाही आनंद झाला. वयाने ९६ वर्षांचे अडवाणीजी हे वयोवृद्ध नेता म्हणून आज देशाला परिचित आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ट्वीट करून त्यांना भारतरत्न सन्मान जाहीर केला आणि पक्षाच्या पितृतुल्य आदरणीय नेत्याविषयी आदर व्यक्त केला. देशाच्या विकासात लालकृष्ण अडवाणी यांचे असणारे योगदान कधीच विसरता येणार नाही, अशा शब्दांत पंतप्रधानांनी त्यांच्या कार्याचा गौरव केला आहे.

दिवंगत पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी, दिवंगत नेते नानाजी देशमुख यांच्यानंतर भाजपा व संघ परिवारात भारतरत्न सन्मान मिळविणारे लालकृष्ण अडवाणी हे तिसरे नेते आहेत. आजवर देशातील पन्नास नामवंतांना हा सर्वोच्च पुरस्कार भारत सरकारने प्रदान केला आहे. भारतीय जनसंघाचे भारतीय जनता पक्षात रूपांतर करण्यात अडवाणी यांचा मोठा वाटा आहे. राम जन्मभूमी आंदोलनामुळे अडवाणी यांचे नाव घराघरांत पोहोचलेच, पण पक्षाच्या अवघ्या दोन खासदारांच्या संख्येवरून शंभर संख्या ओलांडण्यात अडवाणी यांच्या राम रथयात्रेचे फार मोठे योगदान आहे. राम रथयात्रेबरोबरच जनादेश यात्रा स्वर्णजयंती रथयात्रा, भारत उदय यात्रा, भारत सुरक्षा यात्रा, जनचेतना यात्रा अशा सहा यात्रा काढून अडवाणी यांनी देश पिंजून काढला व त्यातूनच भाजपा देशाच्या प्रत्येक राज्यात, प्रत्येक गावांत पोहोचली. अडवाणींवर वयाच्या चौदाव्या वर्षांपासून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्कार आहेत. केंद्रात मोदी सरकार आल्यापासून गेल्या दहा वर्षांत सात दिग्गजांना भारतरत्न हा सर्वोच्च सन्मान दिला गेला. मोदी सरकारच्या काळातील सातवा भारतरत्न सन्मान हा लालकृष्ण अडवाणी यांना जाहीर झाला आहे. २३ जानेवारी २०२४ रोजी बिहारचे माजी मुख्यमंत्री कर्पूरी ठाकूर यांना भारतरत्न (मरणोत्तर) सन्मान जाहीर झाला. याखेरीज गेल्या दहा वर्षांत मदन मोहन मालवीय, अटलबिहारी वाजपेयी, प्रणब मुखर्जी, भूपेन हजारिका आणि नानाजी देशमुख यांना हा सन्मान मिळाला.

भारतरत्न सन्मान मिळाल्याचे समजताच अडवाणी म्हणाले, 'आज मी दोन व्यक्तींचे स्मरण करतो, एक म्हणजे पंडित दीनदयाळ उपाध्याय व दुसरे म्हणजे अटलबिहारी वाजपेयी. मला देऊ केलेल्या सन्मानाबद्दल मी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानतो. आपण वयाच्या चौदाव्या वर्षी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक झालो. जीवनात माझ्यावर जे काम सोपवले गेले, ते काम मी नि:स्वार्थ भावनेतून करीत आलो. ज्या वाक्याने मला जीवनात प्रेरित केले ते म्हणजे - इदं न मम... हे जीवन माझे नाही. तर माझे जीवन राष्ट्रासाठी आहे...'

सन २०१५ मध्ये अडवाणी यांना पद्मविभूषण हा सन्मान मिळाला. देशात हा दुसऱ्या क्रमांकाचा सन्मान आहे. त्या अगोदर अटलबिहारी वाजपेयी यांना भारतरत्न सन्मान जाहीर झाला होता. तेव्हाचे राष्ट्रपती प्रणब मुखर्जी यांनी स्वत: त्यांच्या घरी जाऊन हा सर्वोच्च सन्मान प्रदान केला होता. वाजपेयी ९० वर्षांचे होते. मुखर्जींनी राजशिष्टाचार बाजूला ठेवून कृष्ण मेनन मार्गावरील वाजपेयींच्या घरी जाऊन हा सन्मान दिला होता.



अयोध्येतील राम मंदिरात पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते रामलल्लाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा झाली. जगातील ५० देशांत त्याचे थेट प्रक्षेपण झाले. भाजपाने जेव्हा राम जन्मभूमी आंदोलनाला अधिकृतपणे पाठिंबा जाहीर केला, तेव्हा राम मंदिर हा देशाच्या राजकीय पटलावर प्रमुख मुद्दा बनला. १९८९ मध्ये पालमपूर येथे भाजपाच्या झालेल्या अधिवेशनात रामजन्मभूमी आंदोलनाला पाठिंबा देण्याचा ठराव भाजपाने केला, तेव्हा स्वत: अडवाणी हेच पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष होते. राम मंदिर व अडवाणी हे समीकरण कोणालाही पुसता येणार नाही. वयाच्या ६३व्या वर्षी त्यांनी गुजरातमधील सोमनाथ ते अयोध्या अशी रथयात्रा काढली होती. २५ सप्टेंबरला सुरू झालेल्या रथयात्रेचे नियोजन नरेंद्र मोदी व प्रमोद महाजन यांनी संभाळले होते. आज प्रमोद महाजन हयात असते, तर त्यांनाही अडवाणी यांना भारतरत्न मिळाल्याचा खूप खूप आनंद झाला असता. अडवाणींच्या राम रथयात्रेने देशाच्या राजकारणाची दिशाच बदलून टाकली. १८८४ मध्ये लोकसभेत भाजपाचे केवळ दोन खासदार होते. अडवाणींच्या या रथयात्रेनंतर १९९१ मध्ये भाजपाचे १२० खासदार निवडून आले. रथयात्रेनंतर अडवाणी म्हणजे देशाचा हिंदुत्ववादी चेहरा अशी त्यांची ओळख झाली. उत्तर प्रदेश, बिहार, गुजरात, मध्य प्रदेश, अशा राज्यांत विशेषत: उत्तर भारतातील हिंदी भाषक राज्यांत भाजपाची प्रतिमा उंचावली. बिहारमध्ये समस्तीपूर येथे तत्कालीन मुख्यमंत्री लालूप्रसाद यादव यांनी त्यांची रथयात्रा रोखली व बिहारच्या पोलिसांनी त्यांना २३ ऑक्टोबर १९९० रोजी अटक केली.

अडवाणींच्या रामजन्मभूमी आंदोलनाने देशात भाजपाची मोठी हिंदू व्होट बँक तयार झाली आणि भाजपाला दिल्लीला संसद भवनाकडे व साऊथ व नॉर्थ ब्लॉककडे जाण्याचा मार्ग अडवाणींच्या रथयात्रेने सुकर केला. या वर्षी जानेवारी महिन्यात झालेल्या रामलल्लाच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याला अडवाणी हे वयपरत्वे हजर राहू शकले नाहीत. पण त्यांचे व देशवासीयांचे स्वप्न साकार करण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केले ही भाजपाच्या वाटचालीतील फार मौल्यवान वैभवशाली घटना आहे.

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर अनेक वर्षे काँग्रेस हाच पक्ष सर्वत्र सत्तेवर दिसत होता. या पक्षाला आव्हान देण्याचे काम सर्वप्रथम अडवाणी यांनी केले व त्यांच्या हिंदुत्वाच्या अजेंडाने देशाचे चित्रच बदलले. काँग्रेसला पर्याय भारतीय जनता पक्ष आहे हे आज सारा देश अनुभवतो आहे, पण त्याची पेरणी अडवाणी यांच्या राम रथयात्रेने झाली होती.

जनसंघ किंवा भाजपा यांच्या उभारणीत अडवाणी व वाजपेयी यांचे फार मोठे योगदान आहे. वाजपेयी हे सर्वसमावेश नेतृत्व होतेच, पण त्यांच्या अमोघ वक्तृत्वाने देशातील जनतेला मंत्रमुग्ध केले होते.

अडवाणी हे कुशल संघटक आहेत. दूरदृष्टीचे नेते आहेत. वाजपेयी-अडवाणी या जोडीने काँग्रेसला पराभूत करण्यासाठी अहोरात्र मेहनत घेतली. काही वेळा समाजवादी विचारसरणीच्या पक्षांबरोबर युती करून निवडणुका लढवल्या. जय-पराजयाची पर्वा न करता मतविभाजनाचा लाभ काँग्रेसला मिळू नये याची दक्षता घेतली. अडवाणी हे १९७० मध्ये राज्यसभेवर खासदार म्हणून निवडून गेले, त्यानंतर त्यांनी कधी मागे वळून बघितले नाही. इंदिरा गांधींनी १९७५ मध्ये आणीबाणी लादली, त्यानंतर देशातील विरोधी नेत्यांची जेलमध्ये रवानगी झाली. अडवाणी हे बंगळूरुच्या जेलमध्ये होते. १९७७ मध्ये आणीबाणी उठली नि प्रमुख विरोधी पक्षांनी जनता पक्ष स्थापन केला, त्यात जनसंघही सामील झाला. नंतर झालेल्या लोकसभा निवडणुकीत केंद्रात जनता पक्षाचे सरकार आले व अडवाणी यांच्यावर माहिती व प्रसारण खात्याची जबाबदारी देण्यात आली. जनता पक्षात मतभेद झाल्याने जनसंघ बाहेर पडला आणि १९८० मध्ये भारतीय जनता पक्षाची स्थापन झाली. या सर्व निर्णय प्रक्रियेत अडवाणी यांनी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली. १९८९ मध्ये अडवाणी लोकसभेवर प्रथमच खासदार म्हणून निवडून आले. दिल्ली व गुजरात अशा दोन्ही ठिकाणाहून ते सतत जिंकत राहिले. तब्बल सात टर्म ते लोकसभेत खासदार म्हणून निवडून आले. १९९२ मध्ये बाबरी मशीद उद्धवस्त झाल्यावर भाजपाला इतर पक्ष टाळू लागले होते. पण वाजपेयींसारखा सर्वमान्य व सर्वसमावेशक नेता मदतीला आला.

१९९६ च्या लोकसभा निवडणुकीसाठी अटलबिहारी वाजपेयी हे भाजपाचे पंतप्रधानपदाचे उमेदवार असतील, अशी घोषणा करणारे अडवाणींच होते. त्यांच्या घोषणेने अनेकांना सुखद धक्का बसला. केंद्रात वाजपेयी यांचे पहिले सरकार तेरा दिवस, दुसरे सरकार तेरा महिने व तिसऱ्यांदा पूर्ण टर्म टिकले. त्यांच्या सरकारमध्ये अडवाणी हे उपपंतप्रधान, गृहमंत्री म्हणून नंबर २ होते.

सन २००४ लोकसभा निवडणुकीत भाजपाचा पराभव झाला. केंद्रातील सत्ता गमवावी लागली. नंतर वाजपेयी यांची प्रकृतीही त्यांना साथ देईना. दरम्यान, अडवाणी यांनी केलेल्या पाकिस्तान दौऱ्यात मोहम्मद अली जीना यांच्याविषयी गौरवोद्गार काढल्याने देशातील हिंदुत्ववादी नाराज झाले. अडवाणी यांना पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदावरून पायउतार व्हावे लागले. सन २००९ ची निवडणूक भाजपाने अडवाणींच्या नेतृत्वाखाली लढवली, पण भाजपाने मोठा मार खाल्ला. भाजपाचे ११६ खासदार निवडून आले, तर काँग्रेस पक्षाचे २०६ खासदार विजयी झाले. नंतर गुजरातचे तत्कालीन मुख्यमंत्री नरेंद्र मोदींचा हळूहळू राष्ट्रीय क्षितीजावर उदय झाला. अडवाणी यांचे प्रथम लोकसभेतील विरोधी पक्षनेतेपद गेले. २०१९ ला त्यांना पक्षाने उमेदवारीही दिली नाही, त्यांच्या विरोधाकडे दुर्लक्ष करून पक्षाने मोदींची सुरुवातीला केंद्रीय प्रचार समितीचे समन्वयक व नंतर पक्षाचे पंतप्रधानपदाचे उमेदवार म्हणून निवड केली. मोदी केंद्रात आल्यानंतर अडवाणी यांची पक्षाच्या मार्गदर्शक मंडळात रवानगी झाली. आता वयोमानाने ते घराबाहेर पडू शकत नाहीत.

पत्रकारांना नेहमी वेळ देऊन भेटणारे व दिलखुलास बोलणारे अडवाणी यांनी मुलाखती देणे केव्हाच बंद केले आहे. मात्र देशाच्या राजकारणाला नवीन दिशा देणाऱ्या या भिष्माचार्यांना 'भारतरत्न' देऊन मोदी सरकारने त्यांच्या योगदानाची सर्वोच्च पावती दिली आहे.

**- डॉ. सुकृत खांडेकर**

# मंदिर सरकारीकरण मुक्त करण्यासाठी एकत्रित लढा देणार !

नागपूर, दि. ७ (प्रतिनिधी) - मंदिर सरकारीकरण मुक्त करण्यासाठी एकत्रित लढा देणार असा निर्धार श्रीराम मंदिर रामनगर, नागपूर येथे आयोजित महाराष्ट्र मंदिर न्यास अधिवेशनास उपस्थित मंदिर प्रतिनिधींनी केला. या अधिवेशनात मंदिरांचे सुव्यवस्थापन, मंदिरांचे संघटन, मंदिर सुरक्षा, मंदिरे धर्मप्रसाराची केंद्रे व्हावी या विषयांवर मान्यवर वक्त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. श्री. प्रदीप पांडे, मुंबई उच्च न्यायालयाचे ( पू .) अधिवक्ता सुरेश कुलकर्णी, सुप्रसिद्ध भागवताचार्य परम श्रद्धेय नंदकिशोर पांडे महाराज, महाराष्ट्र मंदिर महासंघाचे समन्वयक तथा हिंदु जनजागृती समितीचे महाराष्ट्र आणि छत्तीसगढ राज्य संघटक श्री.सुनील घनवट, जीवदानी माता मंदिर विरारचे अध्यक्ष श्री. प्रदीप तेंदोलकर, हवाईदलाचे उपप्रमुख (निवृत्त) एअर मार्शल शिरीष देव, माजी धर्मादाय आयुक्त श्री. दिलीप देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते.

श्री गुरु बृहस्पती मंदिर, संकटमोचन पंचमुखी हनुमान मंदिर, महाराष्ट्र मंदिर महासंघ आणि हिंदु जनजागृती समिती, श्री गणेश मंदिर टेकडी यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र मंदिर-न्यास अधिवेशन (नागपूर-विदर्भ प्रांत) आयोजित करण्यात आले होते. या अधिवेशनाला २५० हुन अधिक मंदिर प्रतिनिधिंची उपस्थिती लाभली. मान्यवर आणि संतांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने अधिवेशनाला प्रारंभ झाला.




**सरकारीकरण झालेली मंदिरे भक्तांच्या स्वाधीन करावीत आणि मंदिरांचा निधी धर्मासाठीच वापरला जावा ! - सुनील घनवट**

अनेक मंदिरे ही शासनाने ताब्यात घेतली आहे. त्या मंदिरांमधून मोठ्या प्रमाणात देवनिधीचा अपहार सुरु आहे. मंदिरांच्या प्रथा परंपरा बंद पडत आहेत, मंदिरात हिंदूनी अर्पण केलेला कोट्यवधींचा निधी अन्य पंथीयांसाठी वापरला जात आहे हे सर्व मंदिर सरकारीकरणाचे दुष्परिणाम आहेत. हे थांबवायचे असेल, तर मंदिरे भक्तांच्या स्वाधीन करावी आणि मंदिरांचा निधी धर्मासाठीच वापरला जावा, असे श्री. सुनील घनवट म्हणाले. वक्फ कायद्याची भयावहता स्पष्ट करताना ते म्हणाले की भारतात संरक्षण मंत्रालयाकडे १८ लक्ष, तर रेल्वेकडे १२ लक्ष एकर भूमी आहे. त्यानंतर सर्वाधिक ८ लाख एकर भूमी वक्फ बोर्डाच्या ताब्यात आहे. हिंदूंची अनेक मंदिरे, जमिनी, गावे वक्फ बोर्डाने बळकावलेली आहेत म्हणून सरकारने त्वरित वक्फ बोर्ड रहित करावा. तसेच बळकावलेल्या जमिनी मूळ मालकांना परत करण्यात याव्यात, असे प्रतिपादन त्यांनी केले.

**ईश्वराची कृपा असेल, तर मंदिराचे कुठलेही कार्य पूर्णत्वास जाऊ शकते !**

**- श्री. प्रदीप तेंदोलकर, जीवदानी माता मंदिर, विरार, मुंबई**

मंदिराकडे विविध माध्यमातून पैसा येत असतो.त्या पैशाचा योग्य पद्धतीने विनियोग करणे आवश्यक आहे. जीवदानी मंदिरातर्फे अल्प शुल्क घेऊन दर्जेदार शिक्षण देण्याचा प्रयत्न केला जातो. मंदिराचे संपूर्ण व्यवस्थापन भक्त केंद्रस्थानी ठेवून केले जाते, पारदर्शक व्यवहार, स्वच्छता, सुरक्षित वातावरण असल्यास भाविक मंदिराशी जोडला जातो, मंदिर निधीचा वापर करताना भाविकाना अधिकाधिक लाभ कसा होईल या दृष्टीने त्याचा विनियोग केला जावा असे आवाहन श्री. प्रदीप तेंदोलकर यांनी केले.

वायुदल उपप्रमुख (निवृत्त) शिरीष देव यांनी अधिवेशनास संबोधित करतांना हिंदू शारीरिक आणि मानसिक दृष्ट्या कणखर होतील, तेव्हा हिंदु धर्माचे उन्नती होईल, असे प्रतिपादन केले.

मंदिर विश्वस्तांनी त्यांच्याकडे असलेल्या प्रत्येक मालमत्तेची नोंद ठेवणे आवश्यक आहे. मंदिराचे ठराव, कागदपत्रे, घटना जतन करणे आवश्यक आहे आणि त्यामुळे मंदिराच्या व्यवस्थापनात अडचण येत नाही. अभिलेख व्यवस्थापन केले तर मंदिरांचे अधिग्रहण करण्याचे प्रमाण कमी होऊ शकते. तसेच धर्मादाय आयुक्त आणि विश्वस्त त्यांच्यात समन्वय असावा असे प्रतिपादन माजी धर्मादाय आयुक्त श्री. दिलीप देशमुख म्हणाले.

**मंदिर सरकारीकरण होऊ नये यासाठी संघटितपणे प्रयत्न होणे आवश्यक ! - श्रीकांत पिसोळकर**

मंदिरे ही चैतन्याचे स्त्रोत आहेत. भारतात एकही मशीद किंवा चर्च सरकार ताब्यात घेत नाही; पण हिंदूच्या मंदिरांचे सरकारीकरण होते. सरकारीकरण झालेली मंदिरे म्हणजे राजकारण्यांसाठी भ्रष्टाचाराची कुरणे बनली आहेत. सरकारीकरण झालेल्या एकाही मंदिरात सुव्यवस्थापन नाही. सगळीकडे भ्रष्टाचार होत आहे. त्यामुळे आपले मंदिर सरकारीकरण होऊ नये यासाठी संघटितपणे प्रयत्न होणे आवश्यक आहे.

**मंदिर होण्यासाठी विश्वस्त आणि भक्त यांची भुमिका महत्वाची !**

**- सुप्रसिध्द भागवताचार्य परम श्रद्धेय नंदकिशोर पांडे महाराज**

महाराष्ट्र मंदिर न्यास अधिवेशनास त्याला माझं समर्थन आहे. आपण धर्माचे रक्षण केले, तर धर्म आपले रक्षण करतो. केवळ मंदिरामध्ये किंवा मूर्ती प्रतिष्ठापना झाल्याने ते मंदिर होत नाही, तर तेथे पुजारी किंवा पुरोहित यांचे मंत्रोच्चरण, विश्वस्तांची समर्पित भावना तसेच भक्तगण यांची श्रद्धा यांनी ते मंदिर बनते.

**धर्मासाठी अधिवक्त्यांचे संघटन आवश्यक ! - ( पू. ) अधिवक्ता सुरेश कुलकर्णी**

मंदिरे आणि वकील यांचा जवळचा संबंध आहे. अलीकडेच न्यायलीन लढ्याच्या माध्यमातून हिंदूंच्या बाजूने अतिशय चांगले निर्णय मिळाले. त्यामुळे धर्मासाठी अधिवक्त्यांचे संघटन आवश्यक आहे, हे अधोरेखित होते.

या वेळी मंदिर विश्वस्तांच्या समस्या, सुव्यवस्थापन, याविषयी परिसंवादाचे अयोजान करण्यात आला होता. या परिसंवादातून विविध प्रश्नांवर उपस्थिताना मान्यवर वक्त्यांनी मार्गदर्शन केले, तसेच त्यांच्या शंकांचे निरसनही करण्यात आले.

प्रारंभी सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉक्टर जयंत आठवले यांच्या संदेशाचे वाचन हिंदू जनजागृती समितीचे श्री. अभिजीत पोलके यांनी केले. मंदिर महासंघाचा कार्यात्मक आढावा श्री. सुनील घनवट यांनी मांडला. सूत्रसंचालन अधिवक्ता सौ. वैशाली परांजपे आणि सौ. गौरी जोशी यांनी केले. मंदिराच्या भूमीवर होणारे अतिक्रमण रोखण्यासाठी न्यायालयीन लढा, कुळ कायदा आणि मिळालेले यश या विषयावर श्री. अनुप जयस्वाल यांनी संबोधित केले. श्री. निलेश टवलारे यांनी 'मंदिरातील वस्त्रसंहिता' या विषयावर आणि श्री. अतुल अर्वेन्ला यांनी 'मंदिरातून धर्मशिक्षण' या विषयी मार्गदर्शन केले. या वेळी श्री. रवि वाघमारे, अध्यक्ष, श्रीराम मंदिर रामनगर नागपूर; श्री. मिश्किल पाटील, अध्यक्ष श्री गुरु बृहस्पती मंदिर, कानोलीबारा; श्री. अरुण कुलकर्णी, विश्वस्त, श्री टेकडी गणेश मंदिर आदी मान्यवर उपस्थित होते.

**अधिवेशनातील ठराव :**

१. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन करत महाराष्ट्र सरकारने राज्यातील सर्व मंदिरे सरकारमुक्त करून भक्ताच्या स्वाधीन करावी.

२. महाराष्ट्र सरकारने मंदिराची संपत्ती विकासकामांसाठी न वापरण्याची घोषणा करावी. यांसह एकूण ८ ठराव एकमताने पारित करण्यात आले.

## श्री ज्ञानदेवांनी आई वडिलांचे चरण हेच तीर्थक्षेत्र सांगीतले आहे- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड



अंबड, दि. ७ (प्रतिनिधी) - संत श्री ज्ञानेश्वर महाराजांनी सांगीतल्याप्रमाणे आईवडिल हेच खरे चालते-बोलते तीर्थक्षेत्र असल्याने व सर्व तीर्थक्षेत्राचे श्रेष्ठत्व आईवडिलां ठिकाणी एकवटल्याने त्यांची चरण सेवा ही सर्वश्रेष्ठ सेवा व भक्ती असल्याचे ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड यांनी म्हटले.

अंबड तालुक्यातील मौ. खडकेश्वर येथे कीर्तनातून बोलतांना ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड यांनी आईवडिलांच्या सेवेला प्राधान्य देऊन जीवन सार्थकी करण्याचा सल्ला दिला. सकल तीर्थांचिये धुरे । जियें का मातापितरें । तयां सेवेसि कीर शरीरें । लोण कीजे ?, आई वडील असता घरी। कशाला जातो रे पंढरी ? या संत ज्ञानेश्वर माऊलींच्या ओवीचा व संत वचनांचा आधार घेऊन फड यांनी आईवडिलांची सेवा ही सर्वोत्कृष्ट सेवा व हीच खरी सेवाभक्ती असल्याचे म्हटले. पांडुरंग हा आईवडिलांची सेवा करणाऱ्या भक्त पुंडलिकाची वाट पाहत अठ्ठावीस युगापासून उभा आहे. आपणही पुंडलिकाच्या पंक्तीला बसण्याचा प्रयत्न केला पाहीजे. ही पंगत म्हणजे खऱ्या भक्तांची पंगत होय. मातापित्यांना उलट बोलणे, त्यांचा अवमान करणे, त्यांना घराबाहेर काढणे हे महापाप आहे. अशा पापी व्यक्तीने कितीही देवधर्म केले, उपवास-तप केले तरी त्याच्या पदरी कांही पडत नाही. लेक आणि सून यात फरक करणे, सुनेचा छळ करणे, स्त्रीयांकडे वाईट नजरेने पाहणे, मुलगी आणि मुलगा यांत फरक करणे, अस्वच्छ राहणे या बाबी सुध्दा पापाचाच भाग असल्याचे ते म्हणाले.

मनाच्या स्वच्छतेबरोबर घर, आंगण, गल्ली व गावाची स्वच्छता, वृक्षारोपण, पाणी अडवणे-पाणी जिरवणे या बाबी प्रत्येकाच्या कर्तव्याचा एक भाग आहेत. व्यसनाधीनता, कामांधता, चोरी, फसवेगिरी, आळस, टिंगलटवाळी या बाबी व्यक्तीगत जीवनाबरोबर समाज जीवनावर विपरित परिणाम करणाऱ्या असल्याने यापासून दूर राहणे सर्वांच्या हितावह असल्याचेही ते म्हणाले. उपस्थित भाविकांना महाप्रसादाचा लाभ देण्यात आला. मुलांनी अभ्यास कसा करावा व मुलांच्या अभ्यासात पालकांचे योगदान कसे असावे यावर फड यांनी चर्चा केल्याने गावकऱ्यांना एक वेगळाच लाभ व आनंद मिळाल्याची गावात चर्चा होती. अशा किर्तनाने परीवर्तनास वाव मिळेल असेही बोलले जात होते. या कार्यक्रमासाठी नामदेव मुळे, अप्पासाहेब उबाळे, कैलास मुळे, अनंतराव उबाळे, विठ्ठल मुळे, अशोक उबाळे, अर्जुन मुळे, गणपत उबाळे यांनी पुढाकार घेतला होता.

## माता रमाई जयंतीनिमित्त कृतिशिल महिलांचा सन्मान

छत्रपती संभाजीनगर, दि. ७ (प्रतिनिधी) - मॉडर्न कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी आणि विक्रमशिला कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन यांच्या संयुक्त विद्यमाने माता रमाई आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त कृतिशिल महिलांच्या सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवारी ८ फेब्रुवारी रोजी दुपारी साडेबारा वाजता काल्डा कॉर्नर भागातील राठी कॉम्प्लेक्स येथील विक्रमशिला कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन परिसरात हा सोहळा होत आहे.

या सन्मान सोहळ्याचे उद्घाटन वस्तू व सेवा कर विभागाच्या राज्य कर उपायुक्त रंजना देशमुख यांच्याहस्ते होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या डॉ. चित्ररेखा अशोक सिरसे यांची उपस्थिती राहणार आहे. यावेळी रमाई मासिकाच्या संपादक प्रो. डॉ. रेखा मेश्राम हे आपले विचार व्यक्त करणार आहेत. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून एपीआय अरुणा घुले, विक्रीकर निरीक्षक मनिषा बालखंडे यांची उपस्थिती राहणार आहे. यावेळी अनंत बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या अध्यक्ष पंचशीला सुधाकर बनाटे, तुलशी महिला मंडळ, बीडच्या अध्यक्ष दिपा प्रदीप रोडे, जोशाबा प्रतिष्ठाणच्या उपाध्यक्ष प्रियंका रविंद्र जोगदंड यांची उपस्थिती राहणार आहे. या सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**या महिलांचा होणार सन्मान**

माता रमाई जंयती सोहळ्यात करुणाताई तारु, अनिताताई हिवाळे, दैवशाला गवांदे, डॉ. शिल्पाराणी डोंगरे, सुनिता बनकर या महिलांचा सन्मान केला जाणार आहे.

## रोमँटिक महिन्यात येतोय रोमँटिक चित्रपट 'एक ती' अल्ट्रा झकास मराठी ओटीटीवर!

**महाराष्ट्रातील** रसिक प्रेक्षकांचं फेब्रुवारीच्या गुलाबी थंडीत उबदार मनोरंजन करण्यासाठी 'एक ती' चित्रपटाचा १२ फेब्रुवारी २०२४ रोजी 'अल्ट्रा झकास' मराठी ओटीटीवर वर्ल्ड डिजिटल प्रीमियर होणार आहे. चित्रपटाचे दिग्दर्शन अमर सुनील पारखे यांनी केले असून चित्रपटात महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध अभिनेते विजय कदम, अनिकेत केळकर तसेच शेषपाल गणवीर, हर्ष गावडे आणि रूपाली जाधव हे नवोदित कलाकार चित्रपटात हटक्या भूमिकेत दिसणार आहेत.




व्यक्ती आवडणं. प्रेम व्यक्त करणं. प्रेमात बेधुंद होणं. वाट्याला विरह येणं. हे सगळं या चित्रपटात पहायला मिळणार असून या सर्व भावनांना आणखी ठळक करत, मनाचा ठाव घेणारी गाणी प्रेक्षकांना हळवं करून सोडणार आहेत. कष्टाळू आणि जबाबदार युवक ते निधीच्या प्रेमात वेडा झालेल्या विनयचा वेड्यांच्या इस्पितळात जाण्यापर्यंतचा प्रवास चित्रपटात पहायला मिळणार आहे.

'प्रेमाने जग जिंकण्याएवढी ताकत असते असं म्हणतात, अशाच प्रेमातून आजच्या युवकांना आयुष्यातील एक प्रेरणादायी धडा शिकवणारा चित्रपट 'एक ती' प्रदर्शित करताना मन हर्षित होत आहे. अशा प्रकारचे दर्जेदार चित्रपट अल्ट्रा झकासवर संकलित करण्याचा आमचा कायम प्रयत्न आहे.' असे अल्ट्रा मीडिया ॲंड एंटरटेनमेंट प्रा.लिमिटेडचे सी.इ.ओ. श्री.सुशीलकुमार अग्रवाल म्हणाले.

## धक्कादायक; थेट घरात घुसून तरुणीचा विनयभंग, आरोपी ताब्यात

छत्रपती संभाजीनगर, दि. ७ (प्रतिनिधी) - शहरात गुन्हेगारी कमालीची वाढली असून, महिला-मुली कुणीच सुरक्षित नसल्याचे भयंकर चित्र निर्माण झाले आहे. विशेष करून पुंडलिकनगर, शिवाजीनगर भागात तर कायदा-सुव्यवस्था धोक्यात आल्याचे दिसत आहे. कुख्यात गुंडांच्या टोळ्या कुणाच्या घरात घुसतात, धमक्या देतात. महिला, मुलींची छेड काढतात. शिवाजीनगरात रविवारी (४ फेब्रुवारी) रात्री एका गुंडाने दोन साथीदारांसह मिळून कहरच केला. या गुंडाने आधी एका तरुणीला रस्त्यात अडवले. तिला मिठीत घेण्याचा प्रयत्न केला. तिने विरोध केला असता तिच्या घरात दोन साथीदारांसह घुसला आणि तोंडावर धूर सोडला. तिच्या आईच्या गळ्याला चाकू लावत तरुणीसोबत गैरकृत्य करण्याचा प्रयत्न केला. नागरिक धावून आल्यानंतर गुंडांनी पळ काढला. या घटनेमुळे तरुणी आणि तिची आई भयग्रस्त झाली आहे. पुंडलिकनगर पोलिसांनी तातडीने गुंडाच्या मुसक्या आवळल्या.

कुख्यात गुंड साईनाथ ऊर्फ पिन्या ऊर्फ प्रतीक गणेश खडके (२१, रा. भारतनगर) असे नराधमाचे नाव आहे. पीडित २० वर्षीय तरुणी बँक परीक्षेची तयारी करते. त्यासाठी तिने क्लास लावला आहे. तिच्या वडिलांचे कॅन्सरने ८ महिन्यांपूर्वी निधन झालेले आहे. आई, लहान भावासह ती शिवाजीनगरात राहते. आई एका खासगी रुग्णालयात काम करते. रविवारी रात्री साडेआठला ती क्लासेसवरून घराकडे पायी येत होती. नराधम साईनाथ ऊर्फ पिन्याने तिचा पाठलाग सुरू केला. त्याने तिला रस्त्यात अडवले. तुला काही बोलायचे आहे असे म्हणत तिच्याजवळ जात त्याने तिला मिठीत घेण्याचा प्रयत्न केला. तरुणी त्याच्या ताब्यातून सुटका करून घेत पळाली. घरी आल्यानंतर तिने आईला घडलेला प्रकार सांगितला. तिच्या आईने आपण उद्या सकाळी पोलिसांत तक्रार करू, असे सांगितले. मात्र रात्री ११.१५ वाजता पिन्या दोन साथीदारांसह तरुणीच्या थेट घरी आला. त्याने धमकावत आई, मुलीच्या तोंडावर धूर सोडला. त्यानंतर तरुणीच्या आईच्या गळ्याला चाकू लावून तरुणीसोबत गैरकृत्य करण्याचा प्रयत्न केला. तरुणी व तिच्या आईने आरडओरड सुरू केल्याने शेजारी पाजारी धावून आले. ते आल्यामुळे गुंडांनी पळ काढला. त्यानंतर तरुणीने आईसह पुंडलिकनगर पोलीस ठाण्यात येऊन तक्रार दिली. पोलिसांनी तातडीने हालचाली करत पिन्याला रात्रीच ताब्यात घेतले.

## वाईनशॉपच्या हस्तांतरणासाठी पावणेसात कोटी रुपये हडपले

जालना, दि. ७ (जिल्हा प्रतिनिधी) - वाईनशॉपचे दुकान हस्तांतरित करून देण्यासाठी जालना येथील अविनाश धर्मा चव्हाण आणि पूनमसिंग महादुसिंग ढोबाळ यांची ६ कोटी ७७ लाख रुपयांची फसवणूक झाली होती.

याप्रकरणात सदर बाजार पोलिस ठाण्यात चार महिन्यापूर्वी जालन्यातील प्रसिद्ध मद्यसम्राट जगदीश खट्टर आणि त्याचा मुलगा अमित खट्टर यांच्यासह काहीजणाविरुद्ध भादंवि. ४२०, १२० ब, ४०६, ४६५, ३४ आणि एम पी आय डी ॲक्ट ३,४,५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

त्यानंतर या गुन्ह्याचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला होता. तेव्हापासून या गुन्ह्यातील सर्व आरोपी फरार होते. दरम्यान, आर्थिक गुन्हे शाखेने या गुन्ह्यातील एक आरोपी अमित जगदीश खट्टर यास चंद्रपूर येथे अटक करून जालण्यात आणले. दरम्यान, आज अमित खट्टर यास जालना येथील चौथे जिल्हा सत्र न्यायाधीश श्री. अडकिने यांच्या न्यायालयासमोर हजर करण्यात आले असता त्याची सात दिवसाच्या पोलीस कोठडीत रवानगी करण्यात आली आहे.

(पत्रकार पोलीस समन्वय ग्रुप )

## मनपा आयुक्तांचे मानले आभार; नागरिकांकडून मनपा कर्मचाऱ्यांचा गौरव



छत्रपती संभाजीनगर, दि. ७ (प्रतिनिधी) - शहर नुकतेच एका मोठ्या संकटापासून वाचले आहे.एका अपघातग्रस्त गॅस टँकर मधून निघणाऱ्या गॅस मुळे सिडको एन ०३ परिसरातील नागरिकांचे जीविताला धोका निर्माण झाला होता.

मा.आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांच्या निर्देशानुसार मनपा च्या अग्निशमन दल,पाणीपुरवठा विभाग, माजी सैनिक नागरी पथक,स्वच्छता निरीक्षक यांच्या अथक परिश्रमातून शहरावरील मोठे संकट टळले आहे.मनपाच्या सुश्म नियोजनाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांच्या निर्देशानुसार अग्निशमन दलाच्या जवानांनी नेहमी तंदुरुस्त राहिले पाहिजे या करिता नागरी मित्र पथक प्रमुख प्रमोद जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली गरवारे क्रीडा संकुल येथे रोज कवायत घेण्यात येते.या ठिकाणी दररोज असंख्य नागरिक सकाळी फिरण्यासाठी येत असतात.

आज सकाळी या ठिकाणी फिरायला येणाऱ्या जवळपास ३० ते ४० नागरिकांनी कवायत करत असलेल्या अग्निशमन अधिकारी , दलाचे ५७ कर्मचारी यात ५४ पुरुष व ०३ महिला कर्मचारी व नागरी मित्र पथक प्रमुख यांना गुलाब पुष्प देऊन त्यांनी दाखवलेल्या धाडसाबद्दल त्यांचे अभिनंदन केले. या अनेपक्षित गौरवा मुळे सर्व जण भारावून गेले होते.नागरिकांनी सर्वांचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या यावेळी मुख्य अग्निशमन अधिकारी शिवाजी झनझन,राजू सुरे,नागरिक मित्र पथक प्रमुख प्रमोद जाधव,दौलत म्हस्के,संजय पवार व जवान यांची उपस्थिती होती.

## महानगरपालिकेच्या वतीने आता कर समाधान शिबिर

छत्रपती संभाजीनगर, दि. ७ (प्रतिनिधी) - महानगरपालिकेच्या वतीने आता महानगरपालिका मुख्यालय येथे कर समाधान शिबिर आयोजीत करण्यात येणार आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांच्या निर्देशानुसार छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील मालमत्ताधारकांना त्यांचे मालमत्ता कराबाबत आक्षेप /तक्रारी निकाली काढण्यासाठी व त्यांचे शंकेचे निरसन होऊन त्यांना कराचा भरणा सुलभतेने होण्यासाठी मा. आयुक्त तथा प्रशासक, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांच्याकडे दर महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या शुक्रवारी सकाळी १०.०० ते १२.०० या वेळेत महानगरपालिका मुख्यालय येथे 'कर समाधान शिबिर' आयोजीत करण्यात येत आहे.

सदर शिबिरामध्ये सबंधित मालमत्ता धारकांना त्यांच्या कराबाबत आक्षेप / तक्रारी असल्यास सबंधित प्रशासकीय (झोन ) कार्यालय मध्ये अर्ज दाखल करून कर समाधान शिबिरात उपस्थित राहता येईल अशी माहिती उप आयुक्त ०२ (कर) अपर्णा थेटे यांनी प्रशासनाच्या वतीने केले आहे. करिता जास्तीत जास्त नागरिकांनी याचा लाभ घ्यावा असे महापालिकेकडून आवाहन करण्यात येत आहे.

## पाणी योजनेवरील संकट टळले, राज्य शासन भरणार मनपाचा वाटा

छत्रपती संभाजीनगर, दि.७ (प्रतिनिधी) - छत्रपती संभाजीनगर शहराच्या पाणीपुरवठा योजनेसाठी मनपाच्या वाटेला असलेले ८२२ कोटी रुपये राज्य सरकार भरणार आहे, यावर शिक्कामोर्तब झाला आहे. मंत्री व पूर्व मतदारसंघाचे आमदार अतुल सावे यांनी मंत्रीमंडळ बैठकीत याबाबत निर्णय झाल्याची माहिती दिली आहे.

केंद्र शासनाच्या अमृत-२ योजनेतून शहरासाठी २,७४० कोटी रुपयांची पाणीपुरवठा योजना राबविण्यात येत आहे. या योजनेत केंद्र शासनाचा ३०, राज्याचा ४५ तर महापालिकेचा ३० टक्के वाटा आहे. मात्र मनपाच्या तिजोरीत खडखडाट असल्याने मनपाचा हिस्सा देखील राज्य शासनानेच भरावा अशी मागणी करण्यात आली होती.

## गायक जयदीप बगवाडकरचं नवं गाणं प्रेक्षकांच्या भेटीला 'ओ भाऊ ओ दादा ..',

**'लोकशाही'** हा चित्रपट येत्या ९ फेब्रुवारीला तुमच्या जवळच्या सिनेमागृहात प्रदर्शित होणार आहे. घराणेशाहीतल्या या सत्तासंघर्षात नेमके काय आव्हान असणार आहे आणि या आव्हानाला जनतेचा काय कौल असणार आहे, हे गुपित प्रेक्षकांची उत्सुकता वाढवणारी आहे. अल्ट्रा मीडिया अँड एंटरटेनमेंट प्रस्तुत संजय अमर दिग्दर्शित 'लोकशाही' चित्रपटातील 'ओ भाऊ ओ दादा..', हे गाणं प्रेक्षकांच्या भेटीला ५ फेब्रुवारीला आलं आहे.

महत्त्वाचं म्हणजे, सुप्रसिध्द गायक जयदीप बगवाडकर यांनी आजवर मराठी आणि हिंदी अशा दोन भाषांमध्ये अनेक लोकप्रिय गाणी गायली आहेत. त्याचप्रमाणे त्यांनी संगीत क्षेत्रातील नामांकित दिग्गज, गायिका श्रेया घोषाल, वैशाली सामंत, बेला शेंडे तसेच गायक अवधूत गुप्ते यांच्यासोबत अनेक रिॲलिटी शोज केले आहेत.

जयदीप बगवाडकर यांचे सूर लाभलेल्या या गाण्याचे बोल संजय अमर यांचे असून या गाण्यामधून अभिनेता अंकित मोहन चा डॅशिंग लूक दिसत आहे. या चित्रपटात सुप्रसिद्ध अभिनेते मोहन आगाशे, समीर धर्माधिकारी, तेजश्री प्रधान, भार्गवी चिरमुले आणि मराठी सिनेसृष्टीत नावाजलेला अमराठी अभिनेता अंकित मोहन यांच्या प्रमुख भूमिका आहेत. दिग्गज कलाकारांच्या उपस्थितीत लोकशाही सिनेमाचा ट्रेलर लॉंच झाला आहे. इतकंच नव्हे तर ट्रेलर प्रदर्शित झाल्यापासून प्रेक्षकांमध्ये उत्सुकता पाहायला मिळत आहे.

'अल्ट्रा मीडिया ॲन्ड एन्टरटेन्मेंट प्रा.लि' कंपनीचे एमडी आणि सीईओ श्री. सुशीलकुमार अग्रवाल यांनी सांगितले की, अल्ट्रा च्या




माध्यमातून रसिकप्रेक्षकांसाठी मनोरंजनात्मक एव्हरग्रीन चित्रपटांची प्रस्तुती करत आलेलो आहोत. तसेच वेगळ्या धाटणीच्या चित्रपट निर्मितीचा व प्रस्तुतीचा आमचा कल आहे. शिवाय या चित्रपटात राजकीय संघर्षावर आधारित 'ओ भाऊ ओ दादा..', हे गाणं नक्कीच प्रेक्षकांच्या पसंतीस उतरेल.'

**बहुचर्चित 'लोकशाही' चित्रपट ९ फेब्रुवारीला संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार!**

नुकत्याच प्रदर्शित झालेल्या अल्ट्रा मीडिया अँड एंटरटेनमेंट प्रस्तुत लोकशाही चित्रपटाच्या ट्रेलर आणि गीतांनी महाराष्ट्रातील रसिक प्रेक्षकांमध्ये कमालीची उत्सुकता निर्माण केली आहे. लोकशाही चित्रपट येत्या ९ फेब्रुवारी २०२४ रोजी संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार असून प्रेक्षकांना चित्रपटगृहात विलक्षण अनुभव घेता येणार आहे. राजकारणातील महिलांचं अस्तित्व, घराणेशाही, सत्तासंघर्ष, निवडणुकांची रणधुमाळी, राजकीय कुरघोडी, पक्षांचा प्रचार आणि विजयाचा गुलाल चित्रपटात पहायला मिळणार आहे. ज्येष्ठ अभिनेते मोहन आगाशे आणि महाराष्ट्राची लाडकी अभिनेत्री तेजश्री प्रधान यांच्या भूमिका प्रेक्षकांना खिळवून ठेवणार असून अंकित मोहन, गिरीश ओक, समीर धर्माधिकारी, भार्गवी चिरमुले, अमित रियान, शंतनु मोगे, प्रसन्न केतकर, सुश्रुत मंकणी, अजिता कुलकर्णी, सोनल वाघमारे हे सुप्रसिद्ध कलाकार राजकारणाच्या भयाण खेळात धुरळा उडवणार आहेत.

लोकशाही ही एका घराणेशाहीतल्या एका मुलीच्या वैयक्तिक पेचप्रसंगाची कथा आहे, जी तणावग्रस्त राजकीय नाटकाच्या पार्श्वभूमीवर घडलेल्या नैतिक अनैतिक कृत्यांवर आधारित आहे. समाजकारणात रस असलेल्या राजकारणी घराण्यात वाढलेल्या मुलीच्या आयुष्यात अनपेक्षित घटनांची साखळी घडत जाते. जी साखळी तिच्या वडिलांच्या हत्येचं कारण बनते. सत्तेच्या हव्यासापोटी रक्ताच्याच नात्यांनी तिच्या वडिलांचा जीव घेतला आहे, मात्र हत्या आणि हत्यामागचा कट कोणाचा आहे हे चित्रपटात कळणार आहे.

लोकशाही चित्रपट सुशीलकुमार अग्रवाल यांनी निर्मित केले असून संजय अमर यांनी कथा, पटकथा आणि दिग्दर्शित केले आहे. चित्रपटाचे संगीत दिग्दर्शन संजय-राजी या जोडीने केले असून चित्रपटातील गाणी जयदीप बागवडकर आणि राजलक्ष्मी संजय यांनी गायले आहेत, तसेच संजय अमर आणि अल्ट्रा मराठीचे बिझनेस हेड शाम मळेकर यांनी गीतांना शब्द दिले आहेत. पैसा आणि सत्ता माणसाला वेडं बनवून टाकते. सत्तेसाठी भुकेले असणाऱ्या अशा लोकांचा संघर्ष आणि त्याचे परिणाम लोकशाही चित्रपटात प्रेक्षकांना पहायला मिळणार आहे. उत्तमोत्तम कथा प्रेक्षकांना सादर करताना एक निर्माता म्हणून अभिमानास्पद भावना आहे. असे अनेक आशयघन चित्रपटांची निर्मिती करून प्रेक्षकांचं भरभरून मनोरंजन करत राहणार आहोत. असे अल्ट्रा मीडिया अँड एंटरटेनमेंट प्रायव्हेट लिमिटेडचे सी.ई.ओ. श्री.सुशीलकुमार अग्रवाल म्हणाले.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# रमाई पहाटने जल्लोष, माता रमाई जयंती उत्साहात साजरी

## छत्रपती संभाजीनगरातील पहिलाच प्रयोग!; शहरवासियांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

छत्रपती संभाजीनगर दि.७ (प्रतिनिधी)- बुधवारची पहाट सिडको कॅनाट परिसरात सळसळती तरुणाई, कलावंतांचे भीमवादळच घेऊन आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सहचारिणी माता रमाई आंबेडकर यांना जयंतीनिमित्त सूरमयी अभिवादन करताना महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या कलावंतांनी आपल्या कलागुणांची खाण येथे रिती करीत रमाईला अभूतपूर्व मानवंदना दिली. शुभ्रवस्त्रात आलेल्या हजारो शहरवासीयांनी गीतगायन, वादन, ढोल, हलगी, फ्लॅश मॉब, डीजेंसह अनेक कलासादरीकरणाच्या या स्मृती आपल्या हृदयात बंदिस्त केल्या.

त्यागमूर्ती रमाई आंबेडकर यांचा ७ फेब्रुवारी हा जन्मदिवस. त्यानिमित्त शहरातील आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते आणि कलाकारांतर्फे 'रमाई पहाट' ही अभिनव मैफल शहरात पहिल्यांदाच आयोजित केली होती. प्रारंभी सामूहिक बुद्धवंदना आणि समता सैनिक दलाच्या महिला पथकाकडून माता रमाईंना सलामी देण्यात आली. रमाई वंदनगीताने या कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर गायन, वादन, कविता, ढोलपथक, लेझीम, हलगीवादन, फ्लॅश मॉब, डान्स, रॅप तथा डीजेंनी कलाप्रकार सादरीकरणाची ही धूम दुपारी १२.३०पर्यंत रंगत गेली. कार्यक्रमानंतर संयोजकांनी परिसर स्वच्छ केला. कार्यक्रमाची सांगता सांगता राष्ट्रगीताने झाली.

सारेगम रि?लिटी शो फेम आंबेडकरी सुफी गायिका आणि भीमशाहीर प्रतापसिंग बोदडे यांच्या कन्या रागिणी बोदडे, 'तुझ्या रक्तामधला भीमराव पाहू दे' आणि गायिका भाग्यश्री इंगळे, 'काळजावर कोरलं नाव भीमा कोरेगाव' फेम गायक अजय देहाडे, आंबेडकरी गझलकार चेतन चोपडे, गायक सचिन भुईगळ, 'मेरा भीम जबरदस्त' फेम कुणाल वराळे, सुफी गायक विजय पवार, प्रख्यात शास्त्रीय गायिका प्रज्ञा वानखेडे, प्रख्यात आंबेडकरी गायिका निकीता बंड यांनी






एकापेक्षा एक बहारदार बुद्ध-भीम व रमाईची गीते सादर करून माता रमाईंना मानवंदना दिली. सूरवाद्य प्रकारात विक्रम पवार यांनी पिंपळाचे पान वाजवून रमाईचे गीत सादर केले. त्यांच्या या लक्षवेधी सादरीकरणाला उपस्थितांनी भरभरून प्रतिसाद दिला.

मुंबईचे मराठी रॅपर राज मुंगसे, जे. सुबोध, अजित, गोकू आणि एएक्सएस बॉय यांच्या अफलातून सादरीकरणाने उपस्थितांना रॅपच्या तालावर डोलायला लावले. या आंबेडकरी रॅपर्सनी रॅपच्या माध्यमातून प्रबोधन करून 'रमाई पहाट' समृद्ध केली. अयुब यांच्या नेतृत्वातील नागपूरचा पोट्टा आणि ग्रुपने सादर केलेल्या आंबेडकरी फ्लॅश मॉबच्या सादरीकरणाला तर उपस्थितांनी अक्षरशः डोक्यावर घेतले. अविनाश भारती, अमोल कदम यांनी कविता सादर केल्या. कैलासनगरच्या प्रियदर्शी सम्राट अशोक युवा मंचचे लेझीम पथक, सुनील दणके यांच्या नेतृत्वातील कन्नडचा ओमसाई हलगी ग्रुप, मृणाल गजभिये यांचे धम्मनाद ढोलपथक, डीजे मयूर आणि डीजे एचके स्टाईल यांच्या सादरीकरणाने तरुणाईला झिंग आणली.

## विकसित भारत संकल्प यात्रेचा केंद्रीय सचिवांनी घेतला आढावा

छत्रपती संभाजीनगर दि.७ (प्रतिनिधी)- केंद्र शासनाच्या विविध योजनांचा लाभ ग्रामिण भागातील लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी जिल्ह्यात आयोजित विकसित भारत संकल्प यात्रेचा आढावा केंद्रीय महिला बालकल्याण विभागाचे सचिव राय महिपत रे यांनी आज आयोजित बैठकीत घेतला.

जिल्हा नियोजन सभागृहात आयोजित या बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मिना, प्रभारी जिल्हाधिकारी डॉ. अरविंद लोखंडे, निवासी उपजिल्हाधिकारी प्रभोदय मुळे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. ओमप्रकाश रामावत तसेच सर्व विभागप्रमुख उपस्थित होते.

जिल्ह्यात विकसित भारत संकल्प यात्रा ८५६ गावांत नियोजित होती.




त्यापैकी ७७८ गावांमध्ये यात्रा नेण्यात आली. उर्वरित ७८ ग्रामपंचायतींमध्ये येत्या आठवड्यात यात्रा नेण्याचे नियोजन करण्यात आले असल्याची माहिती यावेळी सादर करण्यात आली. शिल्लक ग्रामपंचायतींमध्ये विकसित भारत संकल्प यात्रा नेऊन त्या त्या गावांमधील लाभार्थ्यांना योजनांची माहिती, वंचित राहिलेल्या लाभार्थ्यांना लाभ देण्याची प्रक्रिया राबवावी,असे निर्देश श्री. रे यांनी दिले.

## हमी भावाने कापूस खरेदी केंद्र सुरु

छत्रपती संभाजीनगर दि.७ (प्रतिनिधी)- जिल्ह्यात वैजापूर, पाचोड, गंगापूर व लासूर अशा एकूण ४ कापूस खरेदी केंद्रांवर भारतीय कापूस महामंडळ (सी.सी.आय.) मार्फत एफ.ए.क्यू. प्रतिच्या कापसाची किमान हमी दराने खरेदी सुरु आहे. तसेच याव्यतिरिक्त सीसीआय मार्फत जिल्ह्यात सिल्लोड व बालानगर या २ केंद्रावर किमान हमी दराने कापूस खरेदी केंद्र उघडण्याची कार्यवाही सुरु आहे. सर्व कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी आपला कापूस आवश्यक त्या कागदपत्रांसह सीसीआयच्या नजिकच्या केंद्रांवर विक्री करावा,असे महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघाचे विभागीय व्यवस्थापक यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

## 'अमृत'च्या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन; डॉ. प्रिया देशपांडे यांचा लाभार्थ्यांशी संवाद

छत्रपती संभाजीनगर दि.७ (प्रतिनिधी)- खुल्या प्रवर्गातील परंतु आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थी आणि होतकरू तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी 'अमृत' म्हणजेच महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी, पुणे) या संस्थेची राज्य सरकारने स्थापना केली आहे. या संस्थेच्या विविध योजनांचा लाभ जिल्ह्यातील पात्र लाभार्थ्यांनी घ्यावा, असे आवाहन 'अमृत'च्या प्रबंधक अधिकारी व जिल्हा पालक अधिकारी डॉ.प्रिया देशपांडे यांनी संवाद मेळाव्या दरम्यान केले. महाराष्ट्रातील खुल्या प्रवर्गातील अर्थिकदृष्टया दुर्बल घटकांच्या आर्थिक उन्नतीसाठी 'अमृत' (महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी, पुणे) या संस्थेची राज्य सरकारने स्थापना केली आहे. 'अमृत'च्या विविध योजनांचा प्रसार, प्रचार करणे व लाभार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी येथे मंगळवारी (दि.६) बैठक घेण्यात आली. महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी)च्या राज्यसेवा पूर्व आणि मुख्य परीक्षेसाठी निवड झालेल्या उमेवारांना अर्थसहाय्य , संघ लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा पूर्व आणि मुख्य परीक्षेसाठी निवड केलेल्या उमेदवारांना अर्थसहाय्य,अर्थिक विकासाकरिता प्रोत्साहन व प्रशिक्षण कार्यक्रम राबवून स्वावलंबी बनविणे, याच बरोबर कृषी उत्पन्न आधारित लघुउद्योग सुरू करण्यासाठी प्रशिक्षण, कौशल्यविकास प्रशिक्षण व नोकरीची संधी उपलब्ध करून देण्यासाठी समन्वय करून देण्यात येतो. यासाठी अमृतची वेबसाईट www.mahaamrut.org.in या वर सर्व माहिती व अर्ज उपलब्ध करून देण्यात आले आहेत. वेबसाईट वरील अमृतच्या योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचे आवाहन केले.यावेळी डॉ. देशपांडे यांनी प्रभारी जिल्हाधिकारी डॉ.अरविंडे लोखंडे, ग्रामीण तहसीलदार रमेश मुनलोड यांची सदिच्छा, जालना जिल्हा समन्वयक अक्षय लंबे,अनुराधा पुराणिक, सीमा रामदासी आदींची भेट घेतली.

## पालिकेच्या आनंद नगरीच्या १९ स्टॉलमधून विद्यार्थ्यांनी कमविले ११ हजार



वैजापूर दि.७ (प्रतिनिधी)- विद्यार्थ्यांना व्यवहार कळावा, पैशाचा हिशोब कळावा, व ग्राहकांशी माल विकतानाचा व्यवहार कळावा म्हणून शालेय जीवनात 'आनंद नगरी' आनंद मेळा' लावतात व त्यात विविध खाद्य पदार्थाचे स्टॉल लावतात व यातून पदार्थांची आर्थिक देवाण घेवाण होते. याचा भाग म्हणून पालिकेच्या मौलाना आझाद विद्यालयात मुख्याध्यापिका नीता राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली बुधवार (ता.०७) रोजी अशीच आनंदनगरी लावण्यात आली . या आनंदनगरीचे उदघाटन माजी शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत यांनी केले. या आनंदनगरीत १९स्टॉल विद्यार्थ्यांनी लावले ज्यातून ११ हजार रुपयांची उलाढाल माल विकून एका तासातच झाली. या प्रसंगी भाजपा शहर अध्यक्ष दिनेश राजपूत, प्रेम राजपूत,शैलेश पोंदे, सनमिती खनिजो,राजेश गायकवाड, एम.आर. गणवीर, बी.बी.जाधव,सुभाष गोमलाडू, राजश्री बंड, सुवर्णा बोर्डे, ज्योती दिवेकर,लता सुखासे,वैशाली पगारे उपस्थित होते.

## रोटेगाव जि.प.शाळा विद्यार्थ्यांनी घेतला आनंद मेळाव्याचा आनंद

रोटेगाव दि.७ (प्रतिनिधी)- येथील जिल्हा परिषद शाळेत दि.५ फेब्रुवारी २०२४ रोजी बाल आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या आनंद सोहळ्याचा विद्यार्थ्यांसह पालक व ग्रामस्थांनी आनंद घेतला.



आनंद मेळाव्यात विद्यार्थी-विद्यार्थिनींनी अतिशय उत्साहाने खूप छान छान चविष्ट व चटकदार खाद्यपदार्थ बनवून आणले होते. स्टॉलची मांडणी, विविध पदार्थांची विक्री, खरेदी व विविध पदार्थांचा आस्वाद घेण्याचा आनंद मुलांनी लुटला.

सकाळी श्री उमेश शिंदे अध्यक्ष शा.व्य.समिती व मान्यवरांच्या हस्ते बाल आनंद मेळाव्याचे उद्घाटन करण्यात आले.विद्येची देवता सरस्वतीच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांनी केले. मान्यवरांचे स्वागत मुख्याध्यापक श्री खांड गौरे सर व शिक्षक वृंदांनीक केले. विद्यार्थ्यांच्या दैनंदिन जीवनातील मनावरील असलेला अभ्यासक्रमाचा मानसिक ताण तणाव दूर करुन विरंगुळा मिळावा व त्यांच्यातील अंगीकृत सुप्त कलागुणांना वाव देता यावा या उद्देशाने दरवर्षी आनंद मेळाव्याचे आयोजन केले जाते.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मुख्याध्यापक , शिक्षक वृंद जाधव सर, खैरनार सर, पठारे सर, श्रीमती साळुंके मॅडम, श्रीमती छाया बंगाळ यांनी परिश्रम घेतले.


## ई-निविदा प्रथम सुचना प्रसारण

दिनांक ०७/०२/२०२४ पासुन लेखाशिर्ष **ल.पा. कामे व दुरुस्ती (० ते १०० हे.) (२७०२-५९८४) या लेखाशिर्ष अंतर्गत एकुण (१४)** कामांची ई-निविदा प्रसारीत करण्यात येत आहे. सदरचे कामाचे प्रथम प्रसारण ०७ दिवस असून इतक्या कालावधीसाठी प्रसिध्द करण्यात येत आहे. सर्व निविदा अटी व शर्ती http://mahatendars.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तरी सर्व निविदा धारकांनी यांची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरीत/ -**
**जिल्हा जलसंधारण अधिकारी**
**जिल्हा परिषद (ल.पा.) विभाग,**
**छ. संभाजीनगर**

**स्वाक्षरीत/ -**
**अति. मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद,**
**छ. संभाजीनगर**


## माता रमाई भीमराव आंबेडकर यांना वैजापूरात अभिवादन



वैजापूर दि.७ (प्रतिनिधी)- डॉ.बाबासाहेब यांच्या अर्धांगिनी माता रमाई भीमराव आंबेडकर यांना बुधवार (ता.०७)रोजी त्यांच्या जयंती निमित्त येथील पालिकेच्या मौलाना आझाद विद्यालयात अभिवादन कार्यक्रम संपन्न झाला. मुख्याध्यापिका नीता राजेंद्र पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सम्पन्न झालेल्या या कार्यक्रमात माजी शिक्षणाधिकारी तथा सामाजिक कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत यांनी प्रथम माता रमाई यांच्या प्रतिमेला पुष्पहार टाकून अभिवादन केले. भाजपा शहर अध्यक्ष दिनेश राजपूत यांनी ही पुष्प अर्पण करून अभिवादन केले. श्री राजपूत यांनी माता रमाई यांच्या जीवनावर माहिती देऊन प्रकाश टाकला. या प्रसंगी भाजपा जिल्हा दक्षिण उपाध्यक्ष प्रेम राजपूत, नगरसेवक राजेश गायकवाड,भाजपा व्यापारी सेलचे शैलेश पोंदे, सन्मित खनिजो, बी.बी.जाधव, सुभाष गोमलाडू सुवर्णा बोर्डे यांच्या सह जयश्री बंड, लता सुखासे, ज्योती दिवेकर, वैशाली पगारे, यांचीही उपस्थिती होती.

## प.पु.गणेशलालजी म.सा यांच्या जय जय काराने पदयात्रेस प्रारंभ

छत्रपती संभीजीनगर दि.७ (प्रतिनिधी)- प.पु.कर्नाटक गजकेशरी गणेशलालजी म.सा यांच्या ६२ व्या पुण्यतिथी निमीत्त परमेष्ठी ग्रुप तर्फे छत्रपती संभाजीनगर ते जालना पदयात्रा आयोजीत करण्यात आली होती. हि पदयात्रा दिनांक ७ फेब्रवारी रोजी आयोजीत करण्यात आली होती. हि पदयात्रा सकाळी ६ वाजता महावीर भवन कुंभारवाडा येथुन पदयात्रा प्रारंभ झाली. यावेळी श्रावक संघाचे अध्यक्ष झुंबरलाल पगारिया, मिठालाल कांकरिया, मनिष आचलिया, विजय देसरडा, मनसुख चोपडा, रवि लोढा, कुंतीलाल हिरण, दिलीप मुगदिया, संजय कांकरिया, प्रकाश आचलिया, सुभाष सुराणा, महेंद्र बोकडिया, रोहित छाजेड, स्वप्नील पारख, प्रितेश बोरा यांच्यासह परमेष्ठी ग्रुपच्या सदस्यांनी पंचरंगी जैन ध्वाज दाखवुन पदयात्रा प्रारंभ करण्यात आली. यावेळी पुरुष व महिलांनी पंचरंगी ध्वज पुढे घेवुन चालत होते. तसेच महिला व पुरूष शिस्तबध्द लाईनेने एका रांगेत चालत होते. पदयात्रेते ३५० भाविकांचा सहभाग होता. हि पदयात्रा औरंगपुरा, कुंभारवाडा मार्गे चिकलठाणा, करमाड, तदनंतर जालना येथे पोहचुन प.पु.गणेशलालजी म.सा यांच्या समाधी स्थळाचे दर्शन घेतील. तसेच तेथे धार्मिक कार्यकम सुध्दा आयोजीत करण्यात आला आहे. पदयात्रेचे संपुर्ण आयोजन परमेष्ठी ग्रुप तर्फे करण्यात येत असते. पदयात्रेत महावीर गादीया हे छत्रपती संभाजीनगर ते जालना पर्यंत उलटे चालतात पदयात्रेत १० वर्षापासुन ते ७५ व्या वर्षापर्यतच्या महिला व पुरुषांचा सहभाग असतो.


(पान १ वरुन)


### काँग्रेसच्या सत्ताकाळातील अर्थव्यवस्थेवरुन...

मिळाला. काँग्रेसने सीताराम केसरींचे काय केले? ते देशाने पाहिले आहे. देशात पहिल्यांदाच एका पक्षाने आदिवासी समाजाच्या मुलीला राष्ट्रपती केले. काँग्रेसचा विरोध वैचारिक नव्हता, त्यांचा विरोध आदिवासी महिलेच्या विरोधात होता, अशी टीका मोदी यांनी केली.

एनडीएमध्ये आम्ही सर्वात आधी दलितांसाठी आणि त्यानंतर आदिवासींसाठी काम केले. हे लाभार्थी कोण आहेत आणि ते कोणत्या समाजाचे आहेत?, आम्ही जे काही काम केले ते एससी-एसटी आणि ओबीसी समाजातील लोकांसाठी केले आहे. आम्ही झोपडपट्टी वासीयांसाठी काम केले.

मी जेव्हा मुख्यमंत्री होतो त्यावेळी केंद्रातील मंत्री मला भेटायला घाबरत होते. माझ्यासोबत त्याचा फोटो काढला जाऊ नयेत यासाठी काळजी घेत होते, असे मोदी म्हणाले. याचवेळी त्यांनी एक किस्सा देखील सांगितला. गुजरातमध्ये एकदा नैसर्गिक आपत्ती आली होती. यावेळी एका मंत्र्याने गुजरातचा दौरा केला. मात्र, या नेत्याने हेलिकॉप्टरने राज्याचा दौरा केला होता. गुजरातमध्ये उतरण्याची तसदीही या मंत्र्याने घेतली नसल्याचे मोदी म्हणाले.

### पंतप्रधान देशाचा असतो पक्षाचा नसतो

वाईट सुरु असल्याची प्रतिक्रिया त्यांनी दिली.

सरकारी यंत्रणांचा गैरवापर केला जात असल्याची टीका शरद पवार यांनी केली. यावेळी त्यांनी झारखंडमधील मुख्यमंत्री जे एक वेगळी भूमिका घेत होते, त्यांचे उदाहरण दिले. सरकारी यंत्रणांचा गैरवापर केला जातो आहे. असहिष्णुता वाढली असून आपल्याला एकत्र येऊन संघर्ष करावा लागेल बेरोजगारी वाढली असल्याने वैफल्यग्रस्त लोकांची संख्या वाढत आहे. या मुद्द्यावर काम करावं लागेल, असेही त्यांनी सांगितले.

### उत्तराखंड विधानसभेत समान नागरी....

आता अंमलबजावणी झाली.

२०१४ सालच्या लोकसभा निवडणुकीदरम्यान देशपातळीवर समान नागरी कायदा लागू केला जाईल, असे आश्वासन दिले होते. या आश्वासनाच्या माध्यमातून विवाह, घटस्फोट, वारसाहक्क, दत्तक घेणे या संदर्भातील वैयक्तिक कायद्यांसाठी धर्माचा विचार न करता, समान कायदा केला जाईल, असे भाजपाने सांगितले होते. याच आश्वासनाचा एक भाग म्हणून उत्तराखंडच्या सध्याच्या समान नागरी विधेयकाकडे पाहता येऊ शकते. भारतीय संविधानातील अनुच्छेद ४४ मध्ये नागरिकांच्या समान अधिकारांबाबत भाष्य करण्यात आलेले आहे. यावरच तरतुदीचा आधार घेत देशात समान नागरी कायदा लागू केला जाईल, असे भाजपाकडून सांगितले जाते.

भाजपाने २०१४ साली समान नागरी कायदा लागू करण्याचे आश्वासन पुन्हा एकदा २०२२ सालच्या उत्तराखंडच्या विधानसभा निवडणुकीदरम्यान दिले होते. या निवडणुकीत भाजपाचा विजय झाला. त्यानंतर नवनिर्वाचित उत्तराखंड सरकारने आपल्या पहिल्याच मंत्रिमंडळ बैठकीत समान नागरी कायदा लागू करण्याबाबत अभ्यास करण्यासाठी एका समितीची स्थापना केली. या समितीच्या अध्यक्षपदी सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायमूर्ती रंजना प्रकाश देसाई यांची नियुक्ती करण्यात आली होती.

दरम्यानच्या काळात या कायद्याच्या अंमलबजावणीवरून विरोधकांनी उत्तराखंडमधील भाजपा सरकारवर सडकून टीका केली. काँग्रेसचे नेते तथा आमदार प्रीतम सिंह यांच्यासारख्या नेत्यांनी भाजपाकडून विकासाच्या अजेंड्याला दुय्यम स्थान दिले जात आहे. सामाजिक सौहार्द बिघडवून समाजामध्ये ध्रुवीकरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातोय, असा आरोप केला. तर एमआयएमचे नेते असदुद्दीन ओवैसी आणि याच पक्षाचे खासदार इम्तियाज जलिल यांच्यासारख्या नेत्यांनीही समान नागरी कायद्यावरून भाजपावर सडकून टीका केली.

### राहुल गांधी अमेठीतून लोकसभा न लढण्याची शक्यता

अमेठीतून निवडणूक लढणार नाहीत. मागच्या वेळेस ते निवडणूक लढले होते. मात्र, त्यांना पराभूत व्हावं लागलं होतं. तसेच, सोनिया गांधीसुद्धा तेलंगणातून निवडणूक लढणार आहेत अशी प्राथमिक माहिती समोर आली आहे. तसेच, राहुल गांधींच्यासुद्धा दोन्ही जागा या दक्षिण भारतातल्याच असतील असंही सांगण्यात आलं आहे.